# संघमंदिर अहवाल

कार्यवाह : डॉ. रा. अ. भालेराव / सुभाष भागवत

सदस्य : सर्वश्री रोहिदास पांगे, दिलीप भाटवडेकर, दिपक फडके

निमंत्रित : सर्वश्री सतीशचंद्र म्हात्रे, डॉ.शशांक मुळगावकर

पदसिद्ध : कार्याध्यक्ष — प्रा. उषा शशिकांत तांबे

प्रमुख कार्यवाह -- डॉ. राजाराम अमृत भालेराव

कोषाध्यक्ष – सौ. आशा प्रताप मुळगावकर

अहवालसाली संघमंदिर समितीच्या दि.२२/०४/२०१६, २३/०७/२०१६ आणि १८/०३/२०१७ अशा तीन सभा झाल्या. सर्व सभांना सभासदांची उपस्थिती समाधानकारक होती. डॉ.अ.ना.भालेराव नाट्यगृह व इमारतीमधील इतर जागा भाड्याने देणे, महाराष्ट्र शासन, महानगरपालिका यांची वास्तूसंदर्भातील सर्व कामे तसेच संघमंदिर इमारत व नाट्यगृह यातील आवश्यक त्या दुरुस्त्या, आवश्यक ते परवाने, करभरणा व्यवहार, वास्तु मालमत्ता संरक्षण, उपहारगृह-खानपानसेवा, वास्तुमधील जल व विद्युत व्यवस्था, प्रसाधनगृह व्यवस्था, साफसफाई, रंगरंगोटी, वातानुकुलीत व्यवस्था, कर्मचारी सेवा व त्यांचा अर्थव्यवहार इ.सर्व कामे संघ मंदिर व्यवस्था समितीकडे आहेत. ती सर्व कामे व्यवस्थित पार पाडावी यासाठी सर्व सदस्य संघमंदिरात येऊन सहकार्य करीत असतात.

## संघमंदिर

अहवालसाली डॉ.भालेराव नाट्यगृहात एकूण ४९७ प्रयोग झाले. संघमंदिर समितीचे सदस्य व नाट्यगृह व्यवस्थापक श्री.रोहिदास पांगे यांचे सहकार्य समितीला नेहमीच मिळते. नाट्यगृह आरक्षण, नाट्यगृहाची देखरेख व त्यासंदर्भात येणारी सर्व कामे ते आत्मीयतेने करतात. संघमंदिराची इमारत जुनी झाल्याने तिच्या दुरुस्तीचा व देखभालीचा खर्च येत असतो. तसेच वाढता व्यवस्थापन खर्च, वाढती महागाई व गिरगाव येथील मराठी माणसांची वस्ती कमी झाल्यामुळे खर्चाचा ताळमेळ जमविण्यासाठी, नाटकांशिवाय लोकनाट्य, दशावतार, वाद्यमेळ, चित्रीकरण या कार्यक्रमांसाठीही नाट्यगृह दिले जाते. अशाप्रकारे खर्चाचा मेळ बसविण्यासाठी व्यवस्था समितीला परिश्रमपूर्वक वाटचाल करावी लागते. संघ मंदिर समितीच्या कार्यात स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री.शशिकांत तांबे यांचे अमूल्य सहकार्य मिळते. तसेच श्री.स्वामीकुमार बाणावलीकर, सौ.शैलजा म्हात्रे, श्री.सतीशचंद्र म्हात्रे यांचे संघमंदिर व नाट्यशाखा या दोन शाखांना बहुमोल सहकार्य लाभते. संघमंदिरातील विद्युतविषयक(इलेक्ट्रिकल)कामाचे वेळी श्री.राजेंद्र गोळे मार्गदर्शन करतात आणि कामे मार्गी लावतात. श्री.सुभाष भागवत, रोहिदास पांगे तसेच संघमंदीर कर्मचारी व रंगमंच कर्मचारी यांचे समितीला सहाय्य मिळते. विशेषतः सर्व पदाधिकाऱ्यांचे समितीला नियमित विशेष मार्गदर्शन व सहकार्य मिळते. त्यांच्या सहकार्यबद्दल समिती कृतज्ञ आहे.

अहवालसाली समितीने केलेली कामे:

- पुरंदरे सभागृहात वातानुकुलीत यंत्रणा कार्यान्वित केली. त्यात सहा वातानुकुलीत यंत्रे, केबल व त्यासाठी स्वतंत्र मिटर बसविले.
- इमारतीतील अंतर्गत किरकोळ कामे - नियमित.

अहवालसाठी समितीला सहाय्य केलेल्या सर्व तंत्रज्ञ व समीती सदस्य या सर्वांचे आभार.